PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# साहित्य आणि जीवननिष्ठा यांचा अनुबंध

**प्रा. डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील**
**सहाय्यक प्राध्यापक**
**(मराठी विभाग)**
**विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग**
**वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**समर्थनगर, औरंगाबाद.**
**(महाराष्ट्र) भारत**

## प्रस्तावना :

जीवन हे एकसंध आहे. सोयीसाठी जरी आपण त्यांचे विभाग कल्पीत असलो तरी हे विभाग म्हणजे परस्परांपासून अलग असे कप्पे आहेत असे समजता कामा नये. याचे कारण असे की, साहित्य, कला, शास्त्र, व्यक्तिजीवन, व्यक्तीचे परस्परसंबंध, समाजधारणा इत्यादी सर्वांचा जीवनाच्या मुल्याशी आणि प्रत्यक्ष व्यवहाराशी प्रत्येक क्षणी संबंध येत असतो. या दृष्टीने जर पाहिले तर जीवन ही एक व्यापक वस्तू आहे आणि साहित्य हे त्या व्यापक वस्तूचा एक घटक आहे असे मानावे लागते.

संस्कृतदर्शनी ही विचारसरणी जरी सहज पटण्यासारखी असली तरी हा विषय दिसतो तितका सोपा नाही. साहित्यादी जीवनाचे ते बहुविध विभागत आहेत ते स्थिर (Statics) नसतात. त्यात सतत बदल होत असतो. त्यांची एक प्रकृती जरी जे रूळलेले आहे त्याला धरून राहण्याची असली, तरी दुसरी त्याच्या पलीकडे जाऊन ते नव्यांने प्रतीत झाले आहे त्याचा आविष्कार करण्याकडे असते. एखाद्या पोतडीत ज्याप्रमाणे अनंत वस्तू कोंबलेल्या असतात

त्यापैकी काही बाहेर डोकावू पाहतात, क्वचित निसटूही पाहतात, त्याच प्रकारचे हे संबंध असतात, आणि म्हणून एकंदर जीवनाचा जो स्थायी भाव आहे त्यातून बाहेर पडणे हे साहित्यादी विभागांचे एक प्रमुख कार्य असते. प्रस्तुत लेखात आपणाला फक्त साहित्याचाच कार्याचा विचार करावयाचा आहे. परंतु जे साहित्याला लागू पडते तेच थोड्याफार फरकाने इतर कला, शास्त्रे, इत्यादींना लागू पडते. हे सहज कळून येण्यासारखे आहे.

## साहित्य आणि जिवन-निष्ठेचे विवेचन :

साहित्य हा एकंदर जीवनाचा एक विभाग आहे असे कल्पिले तरी, आताच सांगितलेल्या कारणामुळे, त्यांचे स्वतंत्र अस्तित्व त्यामुळे नाकाबूल करता येत नाही. एखाद्या वस्तूचा आविष्कार दुसऱ्या वस्तूतून झाला म्हणजे ती वस्तू सर्वांशाने त्या दुसऱ्या वस्तूवर अवलंबून असते. तिचे प्राथमिक अवस्थेतील जीवन, तिच्या बाह्य आणि आंतरिक जीवनावर होत असलेले संस्कार, तिचे कार्यक्षेत्र, इत्यादी सर्व काही ती ज्या समाजात वावरत असते त्यांच्यावर अवलंबून असते. परंतु त्याचबरोबर व्यक्तीलाही एक स्वतंत्र अस्तित्व असते. त्या व्यक्तीच्या किंंबहुना एकंदर समाजाच्याही, हिताच्या दृष्टीने असे अस्तित्व मान्य करावे लागते. हे ही तितकेच खरे आहे. साहित्य आणि जीवन यांचेही असेच आहे. साहित्य हा जीवनाचो जरी केवळ भाग असला तरी त्याचेही एक स्वतंत्र महत्त्व आहे व हे महत्त्व ते केवळ ज्यातून उदभवले त्याच्यावर अवलंबून नाही हे कबूल करावयाचा हवे. माझ्या मते हा दृष्टीकोणातील फरक अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण साहित्य आणि जीवन यासंबंधी जे वेगवेगळे वाद उत्पन्न होतात त्याचे मुख्य कारण हा फरक न समजल्यामुळे होतात असे मला वाटते. साहित्य हा जीवनाचा एक भाग आहे इत्यावरच थांबले की साहित्य हे जीवनानुकूल असावे, जीवनाला धरून असावे, जीवननिष्ठ असावे, इत्यादी सिद्धांत क्रमप्राप्त होतात व या विषयासंबंधी शास्त्रशुद्ध व संगतवार विचार करणेच कठीण होऊन बसते. तेव्हा हा रूढ मार्ग सोडून थोड्या निराळया पद्धतीने या प्रश्नांचा विचार करता येतो की नाही हे पाहणे महत्वाचे आहे.

जीवन म्हणजे असणे आणि नसणे, वाढणे आणि खुरटणे या विरोधी क्रियांचा सतत संघर्ष होय. थे कधीही थांबत नाही आणि तरीही एका अर्थाने थांबलेले, मरू घातलेले ौहे असे मला वाटते. जीवनाचा जेव्हा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा तेव्हा परिस्थितीप्रमाणे किंवा वैयक्तिक स्वभावाप्रमाणे आपण या क्रियांपैकी एकीवर अधिकर भर देतो, तिला अनुसरून आपले सिद्धांत बनवू पहातो. मरण हीच प्रकृती व जीवन ही विकृती असेही मग कधीकधी वाटते, आणि मरणावर मात करते ते जीवन अशीही आपण व्याख्या करतो. आणि अर्थातच ही दोन्ही प्रकारची ऐकांतिक विधाने पूर्णांशाने खरी नसतात. तारतम्यानेच आपणाला त्यांच्यातून ग्राह्यांश घ्यावयाचा असतो.

या अशा प्रकारच्या दोन विरोधी प्रवृत्तीतून मार्ग काढणाऱ्या जीवनात साहित्याचे कोणते स्थान दिसते? या प्रश्नाचे उत्तर जो जीवनवादी आहे, जीवननिष्ठ आहे तो सामान्यत: असे देईल; 'जे सहित आहे ते साहित्य. साहित्य हे हितकर असावयाला पाहिजे. जीवनात जे शिव आणि सुंदर आहे त्याची दोन प्रतीती घडविली पाहिजे. जीवन समृद्ध केले पाहिजे. अटीतटीच्या प्रसंगी अचूक मार्गदर्शन करून जीवन वाढीला लागले पाहिजे.' ही मागणी अर्थातच रास्त वाटते आणि मग जे कृतिशील साहित्यिक आहेत त्यांच्या लेखण्या स्फुरण पावू लागतात. इतरेजनांनाही बरे वाटते. परंतु साहित्य हे जेव्हा अशा प्रकारे जीवननिष्ठ असावे म्हणून सांगितले जाते, तेव्हा या जीवननिष्ठेत काय अभिप्रेत असते तेही पहिले पाहिजे. जीवनात जी काही शाश्वत मूल्ये आहेत (असे आपण समजतो), त्या मूल्यांच्या प्राप्तीसाठी आणि व्याप्तीसाठी जीवन राबविणे याला आपण स्थूल मानाने जीवननिष्ठा असे म्हणू शकू. या निष्ठेला जर जागावयाचे तर अर्थातच जीवनातील मूल्यांशी जे हानिकारक आहे. त्या सर्वांचा धिक्कार, त्याग व निर्दालन करणे आवश्यक ठरते. जो निष्ठावान आहे तो नेहमीच ऐकांतिक भूमिकेवरून पहात असतो. नव्हे तसे करणे त्याला भागच पडते. या अशा तऱ्हेच्या निष्ठेमुळे जी प्रत्यक्ष हानी होते तिचे उत्कृष्ट प्रत्यंतर आपणाला भावनिक युद्धात आणि आजकालच्या मतप्रणालीच्या (Ideologies) युद्धात चांगलेच

दिसून येते. याच्या उलट जो अनाग्रहवादी आहे तो सारे काही समजून घेण्याचा प्रयत्न करील. प्रत्येक वस्तूतीतल सत्य जाणून घेईल, जाणवून देईल.

साहित्य हे जीवननिष्ठ असले पाहिजे असे म्हटल्यानंतर, साहित्याचा विचार केवळ उपयुक्ततेच्या निकषावरच करणे योग्य ठरते. मग या उपयुक्ततेची कितीही व्यापक अर्थ केला तरी उपयुक्तता ही नेहमीच संकुचित राहणार. तिच्यात एक प्रकारची सावधानता असते. असलेले राखण्याची प्रवृत्ती असते. साहित्य किंवा एकंदर कला उपयुक्तेतच्या पलीकडे जाऊन सत्यदर्शन करून पाहतात. या सत्यदर्शनात एक प्रकारचा तटस्थपणा असतो, एक प्रकारची मुक्तता असते. रूढ समाजरचना, नितिअनीतीच्या कल्पना, मानवाचे व सृष्टीचे एकंदर व्यापार – कोणताही विषय या सत्यदर्शनातून सुटत नाही. केवळ जीवननिष्ठेचाच आग्रह धरला की साहित्याचे आणि कलेचे क्षेत्र संकुचित होते. त्यांच्यात आणि प्रचारात फारसे अंतर ठरत नाही. त्यांच्या मूळ प्रकृतीला बाधा येतो. ती केवळ 'संदेशवाहक' अवजारे ठरतात आणि यातच खरा धोका आहे. कारण त्यांच्या 'संदेशवाहक' स्वरूपाचा एकदा अंगीकार केला की तो संदेश कोणता असावा, कोणता असू नये हे सांगावयाला काही लोक पुढे सरसावतात.

## साहित्य आणि जिवननिष्ठेची चिकित्सा :

आरंभीच सांगितल्याप्रमाणे, साहित्य हा जरी जीवनाचा एक भाग असला तरी साहित्याचे आणि जीवनाचे धर्म एकच आहेत असे अपरिहार्यपणे म्हणता यावयाचे नाही. ते एका अर्थाने लौकिक जीवनापासून मुक्त झालेले असते. अर्थात या विधानावर दोन आक्षेप घेता येतील. पहिला आक्षेप ही भिन्नताच मान्य करणार नाही. साहित्याला जरी काही अंतर्गत नियम असले तरी हे नियम एकंदर जीवनाला पोषक असे जे काही नियम आहेत. त्यांच्यापासून भिन्न असण्याचा संभव नाही अशा तऱ्हेचा हा आक्षेप आहे. सत्य हे जरी एक असले तरी त्याचा आविष्कार भिन्न रीतीने होत असतो. जीवनसृष्टीला हे सत्य शिव-स्वरूपात दिसते. थर कला-दृष्टीला सुंदर स्वरूपात दिसते. शिव आणि सुंदर ही या म्हणण्याप्रमाणे सत्याचीच दोन वेगवेगळी रूपे आहेत. हा आक्षेप समजून घेण्यासाठी कलात्मक सत्य आणि जीवनातील सत्य ही

काय आहेत हे पाहिले पाहिजे. जीवनातील सत्य हे नेहमी सापेक्ष असते. ज्या परिस्थितीत त्याचा आविष्कार व्हावयाचा असतो त्या परिस्थितीची बंधने त्याला लागू असतात. ते मूख्यत: जडजोडीच्या स्वरूपाचे असावेह लागते. याच्या उलट कलात्मक सत्य हे पूर्ण सत्य असते. देशकाल परिस्थितीची बंधने त्याला जखडू शकत नाहीत. 'कालोऽह्यं निरवधिर्विपुला च पृथ्वी' असे एक कलाकारच म्हणून शकेल. कला विश्वात्मक (Universal) असते असे म्हणतात ते याच अर्थाने. जीवन प्रगत व्हावे, अधिकाधिक शिव व्हावे, अशी अपेक्षा असते. कलेची धाव सत्याकडे असते, आणि सत्य हे नेहमीच शिव किंवा सुंदर असेल असे नाही. ते तसे असावे अशी आपण आशा धरतो; पण तो मानवी परिस्थितीचा गुण आहे. त्याने सत्य बांधले जात नाही. तेव्हा साहित्य हे जीवनाचा एक बाजू आहे. त्यात जीवनाचे प्रतिबिंब असावे, जीवनोपयोगी गोष्टींचा भरणा असावा, जीवनाला त्यातून मार्गदर्शन व्हावे – अशा प्रकारचा आग्रह धरण्यात काही अर्थ नाही. साहित्यातून जे सत्यदर्शन होते, त्यातून आपातत: जीवनावर काही परिणाम होतील पण ही परिणामकारकता दुय्यम स्वरूपाची by product च्या स्वरूपाची असते. ज्याप्रमाणे झोपेची आराधना करणाऱ्याला झोप लागत नाही. त्याप्रमाणे मार्गदर्शन पाहिजे असणाऱ्याला मार्गदर्शन तर मिळतच नाही, पण साहित्यकृतीतून भलताच अर्थ काढण्याचा मोह होतो. (प्रा. काणेकरांचे 'पतंगाची दोरी' हे नाटक पाहून आपण बापू किंवा मिकीसारखे होऊ नये असा आचार्य दादा धर्माधिकारी यांनी निष्कर्ष काढला) एक स्वतंत्र वस्तू म्हणून साहित्याचा आपण विचार करावयाला शिकल्यावाचून हे अशा तऱ्हेचे घोटाळे आपणाला टाळता येणार नाहीत.

दुसरा आक्षेप असा घेता येईल की, साहित्याचे आणि जीवनाचे अतंर्गत नियम हे भिन्न आहेत असे मानले तरी ते तसे असणे साहित्याच्या आणि जीवनाच्या दोन्ही दृष्टींनी श्रेयस्कर नाही. जेथे जीवनातील सत्याचा प्रश्न उपस्थित होतो, तेथे कलात्मक सत्याला पड खाल्ली पाहिजे, जरूर तर त्याला मनाईही केली पाहिजे. हा युक्तिवाद सकृतदर्शनी बरोबर आहे असे मला वाटते. कारण कलात्मक सत्य जर 'मूले कुठार' ठरणार असले, तर जीवनाचा पहिला

नियम जो जगणे, त्या नियमानुसार अशा तऱ्हेचे कलात्मक सत्य प्रसूत होऊ देणे धोक्याचे ठरते. परंतु हे एकदा मान्य केले की या सबबीवर कलेची कुचंबणा किंवा गळचेपी करणे सेपे जाते. कोणते सत्य केव्हा अनुकूल आणि केव्हा विघातक ठरेल याचा जीवनाच्या व्यवहारात नक्की नियम नसतो, व शेवटी केवळ सत्तेच्या जोरावर हा सत्याचा प्रश्न निकालात काढला जातो. या धोक्यामुळेच कलेचे वेगळेपण, निरंकुशत्व, स्वतंत्रता आपणाला मान्य करायला हवी.

**समारोप :**

वरील एकंदर विवेचनावरून असे दिसून येईलू, तात्विक आणि व्यावहारिक अशा दोन्ही भूमिकांवरून आपणाला साहित्याकडे केवळ जीवननिष्ठेच्या आग्राहाने पाहून भागणार नाही. साहित्याचा आणि एकंदर सर्व कलांचा स्वतंत्रपणे विचार व्हावयास हवा. जे साहित्यात जीवननिष्ठेचा आग्रह धरतात त्यांच्या साहित्याबद्दल काही अवास्तव कल्पना असतात. (त्यांच्या जीवनविषयक कल्पनांबद्दल न बोलणेच बरे । जे आहे ते उत्तमच आहे अशा तऱ्हेच्या सोयीस्कर कल्पना त्या असतात, कारण आपण पहातोच की भोपळयाचा वेल भुईसपाट असतो व चिंचावर झाडाला लागतात, हे असे नसते तर भोपळा वरून पडून कपाळमोक्ष होतात; चिंच पडली तर फारसे नुकसान नाही. – इति आचार्य दादा धर्माधिकारी. इथेही मग उपयुक्ततावाद आणावा लागतो) जीवन हे जे कोठे तरी भरकटतच चालले आहे. त्याला साहित्य आळा घालू शकेल या समजूतीने ते साहित्याने आज काय करावे आणि काय करू नये हे सांगू लागतात. यात एक परिस्थितीबद्दलचे अज्ञान तरी दिसते किंवा अप्रामाणिकपणा तरी दिसतो. उपयुक्ततावादाचा अंगीकार केल्यामुळे खरे साहित्य मागे पडते. आज केवळ प्रचाराचा साधने जग चालवीत आहेत हे स्पष्ट दिसत असता साहित्याने फारशी क्रांती होईल हे संभवत नाही. जीवननिष्ठेचा आग्रह धरला की जे काही थोडे बदल साहित्य आपलेपणा धरून आहे त्याचाही लोप होण्याचा जबरदस्त भीती आहे. जीवन जगला तर साहित्य जगणार नसून साहित्य जगले तर जगण्यासारखे काही तरी उरणार आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

# संदर्भसूची :

१) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास – अ. ना. देशपांडे

२) मराठी नाट्यसृष्टी – वि. पां. दांडेकर

३) मराठीचा नाट्यसंसार – वि. स. खांडेकर

४) कादंबरी – वि. का. राजवाडे

५) मराठी लघुकथा : तंत्र आणि मंत्र - ना. सी. फडके

६) मराठीतील काही कथाकार – म. ना. अदवंत

७) मराठी कविता स्वरूप: विवेचन – निशिकांत ठकार

८) वृत्तपत्राचा इतिहास, खंड - १ला – रामचंद्र गोविंद कानडे

९) काव्यचर्चा - भिडे, अनंततनय

१०) मराठी साहित्य समालोचन – वि. सी. सरवटे